# जाहिरात

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमार्फत जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथील वैद्यकीय समन्वयक या पदासाठी करार पद्धतीवर जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन दिनांक ०३/०६/२०२५ ते दिनांक ०७/०६/२०२५ पर्यंत दुपारी ०५.०० वाजेपर्यंत पात्र उमेदवाराकडून आवश्यक त्या कागदपत्रासह विहीत नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर विहीत नमुन्यातील अर्ज उमेदवारांना जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथून व्यक्तिशः उपलब्ध होतील. अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण मा. जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, आवक विभाग, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर.

| अ. क्र | कार्यालयाचे नाव | पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणीक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर | वैद्यकीय समन्वयक (MCO) | ०१ | एम.बी.बी.एस. / बी. ए. एम. एस. | मुख्य कार्यकारी अधिकारी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना / आरोग्य सेवा संचालक यांनी निश्चित केल्याल्या मार्गदर्शक तत्वानुसार मानधन देण्यात येईल. |

१. त्यांची नेमणूक ही महात्मा ज्योतिराव जन आरोग्य योजना अंतर्गत कंत्राटी पदावर तात्पुरती असेल व त्यांना कोणतेही नोटीस अथवा कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल व सेवा समाप्त झाल्यावर त्यांना कोणत्याही न्यायालयात नेमणुकी संबंधीने दावा करण्याचा हक्क राहणार नाही तसा शासनाकडे अर्ज करता येणार नाही.

२. त्यांची नियुक्ती ११ महिन्यांचे कालावधीकरिता राहील. त्यांचा परिविक्षा कालावधी त्यांनी नेमणूक स्वीकारलेपासून तीन महिने सुरु राहील. परिविक्षा कालावधीत त्यांचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

३. नियुक्त कर्मचाऱ्यांना वेतनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना किंवा आरोग्य सेवा संचालक यांनी निश्चित केल्याल्या मार्गदर्शक तत्वानुसार मानधनाबाबत वेळोवेळी निश्चित व सुधारित मानधन प्राप्त झाल्यास त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

४. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत केस रजिस्ट्रेशन पासुन ते प्रीऑथ पाठविणे व क्लेम पाठविणे इ. सर्व कामे करावी लागतील व वेळोवेळी प्रशासकीय कार्यालयातून आदेश निर्गमीत होतील ते आपणास बंधनकारक राहतील.

५. त्यांना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे सार्वजनिक सुटयांचा लाभ मिळेल.

६. त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ लागू नाही. त्या अनुसार मिळणारे निवृत्ती वेतन, विमा योजना, भ.नि.निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाही

Scanned with OKEN Scanner

७. अथवा ज्या पदावर नेमणूक केली आहे त्या पदावर कंत्राटीमध्ये नमूद केलेल्या मुदतीबाहेर कोणतेही अधिकार राहणार नाही व त्यांना सदर पदावर कायमपणाचा हक्क / दावा करता येणार नाही.

८. नेमणुकीच्या अटी मान्य असल्यास नियुक्तीचे ठिकाण हजर होणेपूर्वी यांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना यांनी दिलेल्या विहीत नमुन्यातील बंधपत्र रु. १०० चे स्टॅम्प पेपरवर लिहून करार पत्रक देणे बंधनकारक राहील.

९. त्यांची सेवा कोणतेही कारण न देता मुदतीपूर्वी समाप्त करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील. तसेच जर कंत्राटी काळात सेवामुक्त व्हायचे असेल तर १ महिन्याची पूर्व नोटीस किंवा ०१ महिन्याचे वेतन भरुन त्यांना शासन मंजूरीने कार्यमुक्त करण्यात येईल. त्यांचा उपरोक्त कंत्राटी कालावधी समाप्त होताच त्यांची कंत्राटी नेमणूक आपोआप संपुष्टात येईल.

१०. त्यांना दिलेली नेमणूक ही कंत्राटी स्वरुपाची असेल, परंतु जर महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना एक वर्षाच्या आत बंद पडल्यास त्यांची सेवा तात्काळ संपुष्टात येईल.

११.वरील पदाची कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे असेल व ती सुयोग्य प्रकरणी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम असेल सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास कमाल वयोमर्यादा ६२ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

१२. या पदासाठी प्रतिक्षा यादी करण्यात येत आहे.

१३.उच्च शैक्षणिक आर्हताधारकांस व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

१४. वरील पदाच्या उमेदवाराला मराठी भाषेचे ज्ञान असणे व मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

१५. अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल.

१६. उमेदवाराने चुकीची माहिती / कागदपत्रे दिल्यास उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल.

१७. उमेदवाराने अर्ज A4 आकाराच्या कोऱ्या कागदावर कारावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंतर्भूत असाव्यात.

**अ. <u>उमेदवारीची सर्वसाधारण माहिती</u>**

१)अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वतःचे नाव ३) अर्जदाराचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) ४) कामाचा अनुभव काम केलेली संस्था धारण केलेले पद, कालावधी, पदाचा जबाबदारी व वेतन ५) शैक्षणीक अर्हतेचा संपूर्ण तपशील, अभ्यासक्रमाचे नाव, संस्था विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण झाल्याचे वर्ष गुणांची टक्केवारी ६) वैद्यकीय समन्वयक एम. बी. बी. एस / बी. ए. एम. एस. पदवी प्राप्त असलेले उमेदवार

**<u>ब. आवश्यक कागदपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रति व मूळ कागदपत्रे</u>**

१. शैक्षणीक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा दाखला / जन्मतारखेचा दाखला ३) अनुभवाचे प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचे ०२ फोटो

१८. उमेदवाराचे चुकीची माहिती / कागदपत्रे दिल्यास उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाल्यास त्यांची नियुक्ती समाप्त होईल.

१९. अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ०७/०६/२०२५ राहील व अर्ज कार्यालयीन वेळेत सायं. ०५.०० वाजेपर्यंत मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर यांचे कार्यालयात स्वीकारले जातील.

Scanned with OKEN Scanner

२०. मुलाखतीची तारीख ०९/०६/२०२५ वेळ दुपारी .वाजता असुन उमेदवाराने मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांचे कक्षात मूळ कागपत्रासह स्वखर्चाने हजर रहावे. त्यासाठी वेगळी मुलाखत पत्रे पाठविली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

टीपः- सदर जाहिरातीमध्ये कोणताही बदल किंवा रद्द करण्याचे किंवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार मा. जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडे राहतील.

जिल्हा शल्यचिकित्सक
जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर.

प्रति,

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर.

२. अध्यक्ष, महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना कार्यालय, जिल्हा रुग्णालय अहिल्यानगर. प्रत माहितीस्तव सविनय सादर

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, म. ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, मुंबई.

DISTRICT HOSPITAL AHILYANAGAR

Scanned with OKEN Scanner